अनेकान्तएज्युकेशनसोसायटीचे,

# तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती.

(अधिकार प्रदत्त महाविद्यालय)

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

# NOTICE

नोटीस क्र. - 416 दि. २१/११/२०२५

## शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील वरिष्ठ महाविद्यालयातील एम.एस्सी (डेटा सायन्य) भाग १ व २ मधील जात संवर्गातील व राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षणशुल्क योजना (ओपन कॅटेगरी) विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप/फ्रिशिप फॉर्म भरणेसाठी अत्यंत महत्वाची सूचना:-

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिपत्रक क्रमांक पी.जी.एस/१५८४ दि. २५/०६/२०२५ नुसार वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२५- २६ मध्ये एम.एस्सी. (डेटा सायन्स) या वर्गात जे विद्यार्थी प्रवेशित आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, एस.सी, एस.टी, एन.टी, ओ.बी.सी, व एस.बी.सी. या जातसंवर्गातील व राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षणशुल्क योजना (ओपन कॅटेगरी) या सर्व विद्यार्थ्यांना विद्यापीठाने महाडीबीटी पोर्टलवर स्कॉलरशिप/फ्रिशिपचे ऑनलाईन फॉर्म भरणे करिता फी ला मंजुरी दिलेली आहे व सदरचा कोर्स महाडीबीटी या पोर्टलवर मॅपींग झालेला आहे. तरी संबधित सर्व विद्यार्थ्यांनी आवश्यक ती मूळ ओरिजनल कागदपत्रे स्कॅनकरुन खालील वेबसाईटवर लवकरात लवकर ऑनलाईन फॉर्म खाली दिलेल्या वेबसाईटवर भरावेत.

**Website- www.mahadbt.maharashtra.gov.in**

## ऑनलाईन फॉर्म भरणेसाठी मार्गदर्शक सूचनाखालीलप्रमाणे

१) विद्यार्थ्यांचा स्वतःच्या नावाचा जातीचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

२) एस.सी., एस.टी. या कॅटेगरीसाठी स्कॉलरशिपकरीता उत्पन्नाची मर्यादा रु.२,५०,०००/- (अक्षरी- दोन लाख पन्नास हजार रुपये) पर्यंत आहे. सन २०२४-२०२५ मधील मा.तहसिलदार यांचा विद्यार्थ्यांच्या वडीलांचे नावे असलेला उत्पन्नाचा दाखलाजोडावा.

३) एस.सी., एस.टी. फ्रिशिपसाठी उत्पन्नाची मर्यादा नाही. मा. तहसिलदार यांचा २०२४-२५ मधील विद्यार्थ्यांच्या पालकांच्या नावे असलेला उत्पन्नाचा दाखला जोडावा.

४) एन.टी/ओ.बी.सी/एस.बी.सी. या कॅटेगरीसाठी स्कॉलरशिपसाठी उत्पन्नाची मर्यादा १,५०,०००/- (अक्षरी- एक लाखपन्नास हजार रुपये) पर्यंत आहे. मा. तहसिलदार यांचा २०२४-२५ मधील विद्यार्थ्यांच्या पालकांच्यानावे असलेला उत्पन्नाचा दाखला जोडावा.

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

५) बी.सी. फ्रिशिप या योजनेमध्ये एन.टी., ओ.बी.सी, एस.बी.सी. या कॅटेगरीच्या विद्यार्थ्यांनी मा. तहसिलदार यांचा २०२४-२५ मधील विद्यार्थ्यांच्या पालकांच्या नावे असलेला उत्पन्नाचा दाखला जोडावा. उत्पन्नाची मर्यादा ८,००,०००/- (अक्षरी- आठ लाख) पर्यंत एवढी आहे. परंतु ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांचे उत्पन्न आठ लाखापेक्षा जास्त आहे अशा विद्यार्थ्यांनी नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र जोडणे/अपलोड करणे अनिवार्य/बंधनकारकआहे.

६) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क योजनेच्या (ओपन) कॅटेगरीतील विद्यार्थ्यासाठी उत्पन्नाची मर्यादा ८,००,०००/- (अक्षरी-आठ लाख) पर्यंत आहे.विद्यार्थ्यांनी मा. तहसिलदार यांचा २०२४-२५ मधील विद्यार्थ्यांच्या पालकांच्या नावे असलेला उत्पन्नाचा दाखला जोडावा.

७) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क योजनेच्या (एस.ई.बी.सी.) या कॅटेगरीतील विद्यार्थ्यासाठी उत्पन्नाची मर्यादा ८,००,०००/- (अक्षरी-आठ लाख) पर्यंत आहे. परंतु ज्या विद्यार्थ्यांचे पालकांचे उत्पन्न आठ लाखापेक्षा अधिक आहे अशा विद्यार्थ्यांनी नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र जोडणे/अपलोड करणे अनिवार्य आहे. मा. तहसिलदार यांचा २०२४-२५ मधीलविद्यार्थ्यांच्या पालकांच्या नावे असलेला उत्पन्नाचादाखलाजोडावा.

८) वडील हयात नसतील तर आईचे नावाचा २०२४-२५ मधील तहसिलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला व सोबत वडीलांच्या मृत्युच्या दाखल्याची झेरॉक्स जोडावी. अन्य कारणे असल्यास ॲफिडेविट जोडावे.

९) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे प्रवेश फीचे चलन अपलोड करणे

१०) आधारकार्ड बॅंकखाते व मोबाईल नंबरशी संलग्न लिंक असणे आवश्यक आहे.

११) मागील वर्षाचे मार्कशिट झेरॉक्स व इयत्ता १० वीचे गुणपत्रक सर्वांनी जोडावे.

१२) डोमासाईल सर्टिफिकेट जोडावे.

१३) गॅप असेलतर गॅप ॲफिडेव्हिट आवश्यक आहे.

१४) शाळा सोडल्याच्या दाखल्याची झेरॉक्स व पी.जी. साठी टी.सी. झेरॉक्स जोडावी.

१५) विद्यार्थ्यांचे स्वतःचे राष्ट्रीयकृत बॅंकेत किंवा इंडिया पोस्ट बॅंकेमध्ये खाते असणे आवश्यक आहे. सदरचे खाते आधार कार्ड व मोबाईल नंबरला संलग्न लिंक असावे.

१६) महाडिबीटीवरील ऑनलाईन प्रतिज्ञापत्रसंपूर्ण माहिती भरुनअपलोड करावे.

१७) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन फॉर्म भरतानाकरंट डिटेल्स या कॉलम मध्ये फी पेड झिरो (शून्य) टाकणे अनिवार्य आहे. अन्यथा रक्कम टाकल्यानंतर कॉलेजने दिलेली फी सवलतीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बॅंक खात्यावर जमा होईल व विद्यार्थ्यास पुन्हा महाविद्यालयाकडे रक्कम भरावी लागेल याची काटेकोरपणे दक्षता घ्यावी.

१८) स्कॉलरशिप फॉर्म भरताना करंट डिटेल्स् या कॉलममध्ये नॉनग्रॅंटमध्ये प्रवेश असल्यामुळे **UnAided** करावे. तसेच कॉलेजचे नाव खालील प्रमाणे बरोबर सिलेक्ट करावे.

१९) विद्यार्थ्यांना एकावेळी एकाच शिष्यवृत्ती योजनेचा फॉर्म भरावा. एखाद्या विद्यार्थ्याने कोणत्याही दोन योजनेचा फॉर्म भरल्यास एक योजना रिजेक्ट होते व यामध्ये कॅटेगरीतील विद्यार्थ्यांचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होते. यासाठी

विद्यार्थ्यांनी महाडीबीटी वरील पोस्ट मॅट्रीक स्कॉलरशिपचाच फॉर्म भरावा व एकाच योजनेसाठी अर्ज करावा.

२०) विद्यार्थ्यांनी स्कॉलरशिप/फ्रिशिपचे ऑनलाईन फॉर्म भरताना खाली दिल्याप्रमाणे महाविद्यालयाचे नावनिवडावे/ सिलेक्टकरावे.

**Senior College- TuljaramChaturchand College (0)**

महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन फॉर्म भरणेसाठी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागात सायबर झोनमध्ये विनामूल्य सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे. याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा.विद्यार्थ्यांनी फॉर्म भरल्यानंतर फॉर्मची प्रिंट व आवश्यक कागदपत्रे स्वत:जवळ ठेवावीत. विद्यार्थ्यांनी हार्ड कॉपी महाविद्यालयामध्ये जमा करण्याची आवश्यकता नाही.

ज्या विद्यार्थ्यांचा प्रवेश हा फी सवलतीत झालेला आहे अशा विद्यार्थ्यांनी ऑनलाईन स्कॉलरशिप/फ्रिशिपचा फॉर्म भरणे अनिवार्य आहे. अन्यथा विद्यार्थ्यांना उर्वरित फी भरावी लागेल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी व होणा-या आर्थिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

रजिस्ट्रार

TULJARAM CHATURCHAND COLLEGE BARAMATI

प्राचार्य

D:\amsolankar\amsolankar\Scholarship 2024-2025\NOTICE 2024-25.docx